**दि.२३/०७/२०१९**

## प्रेसनोट
## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

**कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत पोलीस ठाणे हद्दीतील इव्हज सोसायटीतील सभासद व नागरीकांची बैठक घेवून जनजागृती करण्यात आली.**

दि.२१/०७/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील केशवनगर भागातील इव्हज सोसायटीतील पदाधिकारी, सभासद, महिला व जेष्ठ नागरीक यांची बैठक घेवून सोसायटीतील समस्या, जेष्ठ नागरीक, महिला वर्ग यांच्या अडी अडचणी समजावून घेण्यात आल्या.

सदर बैठकीमध्ये मुंढवा पोलीस ठाणे पोलीस उप निरीक्षक, आर.व्ही. घाटगे, पोलीस उप निरीक्षक कांबळे, पोलीस हवालदार, शिवरकर, पोलीस शिपाई जमदाडे यांनी बैठकीस उपस्थित पदाधिकारी व नागरीकांना मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सुरू केलेल्या भरोसा सेल, पोलीस काका, बडीकॉप, जेष्ठ नागरीक व महिला, बालक यांची सुरक्षा अशा व इतर विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच थर्ड आय या संकल्पनेच्या अनुषंगाने सोसायटीतील आस्थापना चालक/मालक व सोसायटी पदाधिकारी यांना विविध सोसायटयामध्ये वाढत्या चोरीचे अनुषंगाने सुरक्षेबाबत उपाययोजना म्हणून आस्थापना व सोसायटीचे दर्शनी भागामध्ये मुख्य रस्त्याचे दिशेन सी.सी.टी.व्ही. बसविणेबाबत, सोसायटीमध्ये काम करणारे कामगर, सुरक्षा रक्षक भाडेकरु यांचे चारित्र्य पडताळणी करणे अशा विविध बाबींवर मार्गदर्शन केले असता, नमूद सोसायटीचे पदाधिकारी यांनी पोलीस उप निरीक्षक आर.व्ही. घाटगे यांनी दिलेल्या सुचनांचे स्वागत करुन सोसायटीतील प्रत्येक आस्थापना व सोसायटी परिसरामध्ये विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविणेबाबत आश्वासन दिले.

तसेच पोलीस ठाणेकडील पोलीस हे जेष्ठ नागरीकांना वेळोवेळी भेट देवून त्याचे अडीअडचणी व प्रकृतीबाबत वेळोवेळी विचारणा करत असल्याने जेष्ठ नागरीक व त्यांचे परिवारामध्ये पोलीसांबद्दल आदराची भावना निर्माण होत असून, मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी राबविलेल्या उपक्रमांचे स्थानिक नागरीकांनी कौतुक करुन असे उपक्रम पुढेही चालत राहातवेत याबाबत पोलीसांकडे विनंती केली.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचायांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

